लोकमत

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे

२८, क्वीन्स गार्डन, कॅम्प पुणे -४११ ००१.

(सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था)

Website : http//:barti.maharashtra.gov.in

**महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जातीच्या उमेदवारांसाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोग - राज्यसेवा परीक्षा-२०२० या परीक्षेसाठी नि:शुल्क, अनिवासी प्रशिक्षण (कोचिंग) साठी अर्ज मागविण्यात येत आहे.**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे मार्फत महाराष्ट्रातील अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांसाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोग - राज्यसेवा परीक्षा-२०२० नि:शुल्क अनिवासी प्रशिक्षण (कोचिंग) खालील नमूद केलेल्या प्रशिक्षण केंद्राच्या माध्यमातून राबविण्यात येणार आहे. इच्छूक व पात्र उमेदवारांनी संबंधित महसुल विभागातील जिल्हयांच्या प्रशिक्षण केंद्राशी संपर्क साधून त्या केंद्राकडे अर्ज करावा.

पात्र युवक-युवतींना https://barti.maharashtra.gov.in या वेब साईटवरून 'Notice Board च्या सदराखाली महाराष्ट्र लोकसेवा आयोग - राज्यसेवा परीक्षा लिंकवरून अर्ज डाऊन लोड करून किंवा खालील नमुद प्रशिक्षण केंद्राच्या कार्यालयातून प्राप्त करून खालील पैकी ज्या ठिकाणी त्यांना प्रशिक्षण घ्यावयाचे आहे, त्या ठिकाणी असलेली खालील नमूद केंद्राकडे दि. ३१/०३/२०१९ पर्यंत परिपूर्ण भरलेला अर्ज कागदपत्रांसह सादर करावा.

| अ.क्र. | महसुल विभाग | प्रशिक्षण केंद्राचे नाव / पत्ता / दूरध्वनी क्रमांक |
|---|---|---|
| १ | औरंगाबाद | संबोधी अकादमी संचलित संबोधी स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण केंद्र, ३ रा मजला, सी बिल्डिंग, निर्माण भारती सिटी सेंटर, शासकीय ग्रंथालया समोर, निराला बाजार, औरंगाबाद. मोबाईल क्र. ८७८८०२११९० / ०२४०-२९७०९९० |
| २ | नागपुर | प्रियदर्शी चॅरीटेबल सोसायटी, व्दारा संचलित प्रज्ञा प्रबोधिनी करिअर अकॅडमी, क्वार्टर नं.- १८८/४, शारदा माता मंदिर गार्डन, जुनी पाण्याची टाकी जवळ, भविष्य निर्वाह निधी ऑफिस च्या मागे, सोमवारी क्वार्टर, सक्करदरा, नागपुर.०९ मोबाईल क्र. ९४२३६७०९२६ / ७७०९५००९३२ |

उपरोक्त प्रत्येक प्रशिक्षण केंद्रामध्ये ६० विद्यार्थ्यांची एक बॅच याप्रमाणे अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांची निवड करण्यात येईल. त्यामध्ये ३० टक्के जागा महिलांसाठी, ३ टक्के जागा **"दिव्यांग" असलेल्या व्यक्ती (Person with Disability)**, ५% जागा अनुसूचित जाती अंतर्गत वंचित जाती मधील (वाल्मिकी व तत्सम जाती- होलार, बेरड, मातंग, मांग, मादगी, इ.) जातींचा समावेश गुणवत्ता यादीमध्ये होणार नाही, त्या जातींचे विद्यार्थी निवड प्रक्रिये मध्ये सहभागी झालेल्या यादीतून गुणाक्रमे निवडण्यात येतील. आणि एकूण जागांच्या ५% जागा विशेष बाब म्हणून राखीव ठेवण्यात याव्यात.

**पात्रता :-**

१) महाराष्ट्र राज्याचा रहिवासी व अनुसूचित जातीचा उमेदवार तसेच उमेदवारांचा अधिवासी दाखला असावा.
२) उमेदवाराचे वय महाराष्ट्र लोकसेवा आयोग- राज्यसेवेच्या अटी व शर्ती नुसार असावे.
३) १ एप्रिल, २०१८ रोजी अर्जदार कोणत्याही शाखेचा पदवीधर असावा.
४) महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत २०२० मध्ये घेण्यात येणाऱ्या स्पर्धा परीक्षांस बसणेसाठी पात्र असावा.
५) उमेदवारांनी अर्ज करताना उत्पन्नांचा दाखला जोडावा.

**विद्यार्थी निवडीचे निकष :-**

- प्रशिक्षणातील सर्व जागांसाठी प्राधान्याने गुणवत्ता यादीतील रु. ३ लाखांपर्यंत उत्पन्न मर्यादा असलेल्या सर्व पात्र उमेदवारांना प्रवेश देण्यात येईल. त्यानंतर जागा उरल्यास उर्वरित जागांसाठी रु. ३ ते ६ लाख उत्पन्न असलेल्या पात्र उमेदवारांना प्रवेश देण्यात येईल.

**प्रशिक्षणाच्या अटी व शर्ती :-**

१) वर नमुद प्रशिक्षण संस्थेकडे अर्ज दाखल करण्याची **शेवटची तारीख ३१/०३/२०१९**
२) **प्रशिक्षण कालावधी ४ महिन्यांचा राहील.**
३) विहीत नमुन्यामध्ये आवश्यक कागदपत्रांसहीत अर्ज दाखल केलेल्या पात्र उमेदवारांची चाळणी परीक्षा (MPSC CET-2019) वर नमुद संस्थेमार्फत **दिनांक १३/०४/२०१९** रोजी घेण्यात येऊन उमेदवारांची गुणानुक्रमे कोंचिगसाठी निवड करण्यात येईल.
४) **प्रशिक्षण कोंचिग क्लास दिनांक ०१/०५/२०१९ रोजी सुरु करण्यात येईल.**
५) निवड झालेल्यांपैकी पात्र विद्यार्थ्यांना प्रशिक्षण दरम्यान रोज ४ तास व त्यापेक्षा जास्त तसेच एकूण दरमहा ८० टक्के पेक्षा जास्त कालावधी प्रशिक्षणास उपस्थित राहील त्या विद्यार्थ्यांना दरमहा रुपये ९०००/- विद्यावेतन देण्यात येईल.
६) विद्यार्थ्यांना टेस्ट सिरीज (ऑनलाईन/ ऑफलाईन) व विशेष शैक्षणिक साहित्य यासाठी प्रशिक्षण संस्थाना रक्कम रु. १५०००/- प्रति विद्यार्थी देण्यात येईल.
७) सदर प्रशिक्षण (Coaching) कार्यक्रम **उपरोक्त ०२ विभागीय स्तरावर ०२ प्रशिक्षण केंद्रामार्फत** राबविण्यात येणार असून, त्याबाबत संबंधित विभागात प्रसिध्द वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करण्यात येत आहे. तरी त्या त्या जिल्ह्यामध्ये कोंचिग घेण्यासाठी इच्छूक उमेदवारांनी त्या जिल्ह्यातील जाहिरातीनुसार अर्ज करु शकतील.
८) विहीत नमुन्यातील अर्ज वर नमुद केलेल्या प्रशिक्षण केंद्राच्या कार्यालयाकडून किंवा बार्टी, पुणे या संस्थेच्या वेबसाईट वरुन प्राप्त करुन भरता येईल. अधिक माहितीसाठी वर नमुद प्रशिक्षण केंद्राच्या कार्यालयाशी संपर्क साधावा.

**अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे :-**

१) उमेदवाराचा पासपोर्ट आकाराचा फोटो
२) जातीच्या प्रमाणपत्राची सांक्षाकित प्रत, उत्पन्नांचा दाखला व अधिवासी दाखला.
३) कोणत्याही शाखेची पदवी उत्तीर्ण केलेल्या प्रमाणपत्राच्या सांक्षाकित प्रती.

**कैलास कणसे** (भा.पो.से.)
**महासंचालक, बार्टी, पुणे.**

Adv/MPSC/१०/०३/ २०१९/१३